वाचले :- १) क्र.माध्य/शि/०१/कावि/९१८/२०२४ दि.२८/११/२०२४
२) श्री.कोकणे नामदेव बारकू,सहाय्यक शिक्षक यांचा दि.३०/११/२०२४ रोजीचा खुलासा.
३) माध्यमिक शिक्षण विभागाचा दि. १०/०१/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/९१/२०२५
दि - २०/०१/२०२५

विषय – सक्त ताकीद देणेबाबत....
श्री.कोकणे नामदेव बारकू,सहाय्यक शिक्षक,मा.वि.थेरगाव

आदेश,

तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंतर्गत माध्यमिक विद्यालय,थेरगाव या विद्यालयात सहाय्यक शिक्षक या जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहात.तुम्हाला सहाय्यक शिक्षक पदाची जबाबदारी व कर्तव्य ज्ञात असणे तुम्हास आवश्यक आहे.

श्रीम.कु-हाडे रेखा पोपटराव (मुख्य लिपिक) यांनी दि.१९/११/२०२४ रोजीच्या अर्जान्वये तुमच्या बाबत तक्रार अर्ज या कार्यालयाकडे सादर करणेत आलेला आहे. श्रीम.कु-हाडे रेखा पोपटराव,मुख्य लिपिक यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की तुम्ही दि.०५/०७/२०२४ रोजी विद्यालयात उपस्थित नव्हते व तसा अर्जही तुम्ही विद्यालयात सादर केलेला नव्हता.परंतु दुस-या दिवशी दि.०६/०७/२०२४ रोजी प्र.उपशिक्षणाधिकारी तपासणीकरिता विद्यालयात येणार असल्याने मी हजेरी पत्रकावर दि.०५/०७/२०२४ रोजी त्यांचे CL असे नमूद केले होते.परंतु तुम्ही OD असलेबाबत कोणतेही पुरावे सादर केलेले नव्हते.त्यानंतर २/३ दिवसांनी तुम्ही CL का नमूद केले? तुम्हाला अक्कल आहे का?मी तुमच्याकडे बघतोच अशा भाषेत उध्दटपणे बोलले.सदर बाब कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.तुमच्या या वर्तनामुळे मला खूप मानसिक त्रास होत आहे,असे श्रीम.कु-हाडे रेखा पोपटराव (मुख्य लिपिक) यांनी अर्जात नमुद केले आहे.सदर बाब कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. तुम्हास याबाबत वाचले क्र.०१ अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे.सदर नोटीसचा खुलासा तुम्ही वाचले क्र.०२ अन्वये विहित मुदतीत सादर केलेला आहे.

तरी, त्यामुळे सदर प्रकरणी तुम्हाला शैक्षणिक व प्रशासकीय बाबींच्या सुधारण्याच्या दृष्टीकोनातून एक वेळ संधी देवून तुमचा खुलासा मान्य करणेत येत आहे.तसेच तुम्हास या आदेशान्वये सक्त ताकीद देणेत येते की, तुम्ही यापुढे महिला कर्मचा-यांसोबत उध्दट बोलणे याप्रकारच्या पुन्हा तक्रारी प्राप्त झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका कलम-५६(२)"ड"अन्वये नियमाधिन प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रती,
श्री.कोकणे नामदेव बारकू,सहाय्यक शिक्षक मा.वि.थेरगाव
प्रत,
१) मुख्याद्यापक मा.वि.थेरगाव
२/- सदर आदेश संबधीतांना बजाउन पुर्तता अहवाल इकडिल कार्यालयास सादर करणेत यावा.
२) मा.अतिरिक्त आयुक्त (१),
मा.माहितीसाठी सविनय सादर.